

# हि त गु ज

## २०२५ दिवाळी विशेषांक

## मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा







## अनुक्रमणिका

### मराठी मंडळ कमिटी २०२४-२०२६

**अध्यक्ष:**
केतन कुलकर्णी

**उपाध्यक्ष:**
मधुरा पाटील

**कोषाध्यक्ष:**
रोमा कामत


**सांस्कृतिक सचिव:**
अनुप वराडे
अश्विनी भोसले
प्रथमेश देशपांडे

**संपर्क सचिव:**
स्नेहल कुलकर्णी मुळे
उमेश गावडे

**शाळा सचिव:**
मृदुला वडके

**हितगुज संपादिका:**
अवनी सावरकर-शेंड्ये
वैशाली चिमणपुरे

संपादकीय : अवनी सावरकर-शेंड्ये , वैशाली चिमणपुरे
संगीत मानापमान : स्वामिनी बाबतीवाले
आज : ऋचा सावरकर
संस्कृतीचं झाड जितकं खोल,तितकं समाजाचं नातं मजबूत! : सायली अमरापूरकर
टीका(खोर)! : वासंती मुदकण्णा
उठा,उठा दिवाळी आली,'मोती' स्नानाची वेळ झाली : जयश्री मुळे
इच्छाशक्ती : दीप्ती मुसळगावकर
किल्ला : संदीप गुंड
ओढणी : श्रद्धा कदम
सूर्योदय : नितीन मुळे
धरोहर : अमोल दांडेकर
माझी कविता : प्रवीण पाठक
माझ्या अंगणी तुझे रंग : रसिका राऊत
दिवाळी : छाया केळकर
पहांट भूल : कुंदा शरद देशपांडे
पाऊस नववधूचा : वर्षा देशपांडे
दीपावली : शुभांगी काळे
छोट्यांच्या दुनियेत! : निरुक्ता पंचपुत्रे,आर्या पाठक,मायरा नगरकर,अनिशा साखरकर, मिहिका गोरे,रिधीमा जोशी,मिहिरा जोशी
अभिनंदन : सान्वी जाधव ,सान्वी पाटवर्धन,शौर्या पाठक
उत्सव माझ्या दारी : अर्पिता थत्ते,निकेता वालावलकर,स्वरांजली काळे,श्रध्दा बरीदे, स्नेहल मुळे,रसिका राऊत,प्रविणा पाठक,गौरी केळकर,स्नेहा जोशी,स्वरदा नवले,कल्याणी कुवळेकर,अमृता नगरकर,केतकी कुलकर्णी,अनुपमा जाधव,रुपाली तेलंग,अमरजा बाबतीवाले
कलाकौशल्य : पूनम कुंभार,अंजली भुरे,मधुरा मोडक
पाककला : माधुरी परांजस्पे
मराठी शाळा : मृदुला वडके
मुखपृष्ठ : अनिता अमोलिक, अर्पिता थत्ते



**अवनी सावरकर**

# संपादकीय



**वैशाली चिमणपुरे**

"दिव्यांचा सोहळा"

दिवाळी आली की मनं उजळून जातात,
आठवणींच्या वातींनी दिवे लुकलुकतात.
फराळाचा गोडवा, हास्याचा झरा,
आनंदाचे क्षण जपणारा हा सण सारा.

दिवे फक्त दारात नव्हे, मनात लावायचे,
अंधार पळवून नवे स्वप्न रंगवायचे.
प्रत्येक नात्यात ऊब पुन्हा भरायची,
आणि साध्या क्षणातही दिवाळी साजरी करायची.

रांगोळी रंगवताना उमटते आशेची छटा,
प्रत्येक फुलात उमलते आनंदाची कथा.
सण म्हणजे फक्त सजावट नव्हे,
तर माणुसकीचा सुगंध जपण्याचं व्रत हे.

या अंकात भेटतील दिवाळीचे रंग,
कविता, कथा, पाककृतींचे ढंग.
प्रत्येक पानावर उजळला आहे एक दिवा,
आनंद, प्रेम, आणि संस्कृतीचा नवा झरा.

चला, या दिवाळीत ठरवू या मनाशी,
प्रकाश पसरवू प्रेमाच्या भाषी.
प्रत्येक हृदयात लावूया दीप आशेचा —
आणि साजरा करूया सण, आनंदाने हसण्याचा!





# अध्यक्षांचे मनोगत

प्रिय सदस्यहो,

माझ्या मन:पूर्वक शुभेच्छा आणि नमस्कार!
माणूस जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात गेला तरी त्याचं बिऱ्हाड, भाषा आणि संस्कृती तो सोबतच घेऊन जातो. मराठी माणूस त्याला अपवाद नाही. आपण अमेरिकेत स्थायिक झालो असलो, तरी आपल्या मातृभाषेचा आणि संस्कृतीचा वारसा जपण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. दिवाळीचा हा आनंदाचा सण आपल्या सर्वांच्या जीवनात उत्साह, आनंद आणि नव्या आशा घेऊन येतो. या शुभ पर्वानिमित्त मी आपणास आणि आपल्या परिवारास हार्दिक शुभेच्छा देतो.
आपले सांस्कृतिक व समुदाय कार्यक्रम — संक्रांत, दिवाळी, गणेशोत्सव, वार्षिक सहल, विविध कला-स्पर्धा आणि ह्या वर्षी पहिल्यांदाच आयोजित केलेला मंगळागौर — यांमुळे आपल्या समाजात एकात्मता, मैत्री आणि संस्कृतीबद्दल अभिमान अधिक दृढ झाला. हे सर्व कार्यक्रम म्हणजे आपली ओळख, आपला अभिमान.
विशेष कौतुक , म्हणजे आपल्या ढोल ताशा पथकाचे. ढोलाचे दमदार ताल आणि ताशाची विजेसारखी लय ही फक्त संगीत नाही — ती आपल्या उत्सवांची ओळख आहे, आपल्या परंपरांचा नाद आहे आणि आपल्या समुदायाचा अभिमान आहे. आपले ढोल-ताशा पथक एकाच उद्दिष्टासाठी कार्यरत आहे — जिथे जाऊ, तिथे ऊर्जा, एकता आणि आनंदाची लहर निर्माण करणे! ह्यावर्षी मनोरंजनाबरोबरच मराठी संस्कृती जपणारे कार्यक्रम पार पाडले , आणि आम्हाला खात्री आहे कि पुढच्या वर्षी सुद्धा हि परंपरा व्दिगिणीत करू. आपल्या स्वयंसेवकांच्या अथक प्रयत्नांमुळे आणि समर्पणामुळे आपले विविध उपक्रम यशस्वीपणे पार पडले. त्यांच्या वेळेचे, ऊर्जेचे आणि मनापासून दिलेल्या सेवांचे कौतुक करावे तितके थोडे आहे.या सर्व यशामागे प्रत्येक सदस्याचा हातभार आहे. आपण सर्व मिळून संस्थेचा हा प्रवास अधिक समृद्ध, सर्जनशील आणि प्रेरणादायी करूया. विशेषतः आपल्या MAM मराठी शाळेने सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली आहे. शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहामुळे आणि समर्पणामुळे मुलांना केवळ मराठी भाषा शिकवली जात नाही, तर त्यांच्यात संस्कृती, परंपरा आणि आपलेपणाची भावना रुजवली जात आहे. प्रत्येक शिक्षक आणि स्वयंसेवकाचे योगदान अनमोल आहे. आपल्या अखंड पाठिंब्याबद्दल, प्रेमाबद्दल आणि सहभागाबद्दल मनःपूर्वक आभार. चला, येणाऱ्या वर्षात आपण एकत्र नवीन ऊर्जेने आणि उत्साहाने नवी शिखरे गाठूया.
"जगात नाव मराठी, संस्कृतीची ही ज्योती अखंड पेटती;
अभिमान आमुचा बाणा, मराठी मातीचा सुवास मना."

आपला,
केतन कुलकर्णी
अध्यक्ष मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा (MAM)



**MAM BOD-अश्विनी, मृदुला, अनुप, केतन, रोमा , मधुरा , स्नेहल, प्रथमेश**



# संगीत मानापमान



चिन्मय जोगळेकर



अस्मिता चिंचाळकर

नुकताच कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर लिखित आणि बालगंधर्व अभिनित, संगीत मानापमान या एकशे चौदा वर्षे जुन्या सदाबहार नाटकाच्या प्रयोगाला उपस्थित राहण्याचा योग आला... हा प्रयोग स्वरांगण निर्मित आणि कलांगण अकादमी यांनी प्रस्तुत केला होता. हे नाटक पहाताना मनाच्या एका हळव्या कोपऱ्यातील माझ्या आजीची आठवण ताजी झाली... तिला संगीत नाटके अतिशय प्रिय... लहानपणी आजी बरोबर अनेक संगीत नाटके पाहिली... त्यातील संगीत मानापमान हे पहिले नाटक होते आणि त्यातील भामिनीची भूमिका सादर करणाऱ्या जयमाला शिलेदारबाई मला अतिशय आवडल्या... तेव्हापासूनच भामिनी ही व्यक्तिरेखा माझी अतिशय लाडकी... आज अनेक वर्षांनी तीच भामिनी मला परत भेटली... नवीन रुपातील ती प्रारंभी थोडीशी अल्लड, हट्टी, मनस्वी असलेली, मला भरपूर संपत्ती असलेला, दागिने देणारा नवरा हवा म्हणणारी आणि गरीब पण शूर सेनापती धैर्यधराला स्पष्टपणे नाकारणारी, पण नंतर धैर्यधराचे शौर्य प्रत्यक्ष पाहून त्याच्या प्रेमात पडणारी, नाव व वेशही बदलून युद्धभूमी जवळील गावात वडील आणि सखीसह राहून निडरपणे अपरात्री पहारा देणारी, प्रसंगी हातात तलवार घेऊन शत्रूसैन्यातील चोरांबरोबर युद्धही करणारी तडफदार भामिनी!



कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर


मग नाव बदललेल्या भामिनीच्या प्रेमात पडलेल्या सेनापती धैर्यधराला आपल्या खऱ्या प्रेमाची ओळख पटवून माळ घालते... अशी ही भामिनी जेव्हा सुरांवर पकड घेऊन दमदार ताना घेत एकेक पदांच्या रेशीम लडी उलगडायला लागली तेव्हा मी परत तिच्या प्रेमात पडले... ही भामिनीची भूमिका अस्मिता चिंचाळकर हिने फार सुंदर केली आहे... तसाच सेनापती धैर्यधर, देवी महिषासुरमर्दिनीचा परमभक्त, युद्ध प्रसंगी रणांगणावर आणि युद्ध जिंकल्यावर देवीच्या दर्शनासाठी मंदिरात येतो तेव्हाही माता त्याला प्रत्यक्ष दर्शन देते... हा असा पराक्रमी वीर पण सौंदर्यवती भामिनी, जी त्याला मंदिरात प्रसाद देण्याच्या निमित्ताने भेटणार असते, ती त्याच्या समोरही न येता, दाराआडून त्याचा अपमान करते आणि स्पष्टपणे नाकारते... हा अपमान त्याच्या जिव्हारी लागतो... भामिनीला न पाहताही, तिचे नाव ऐकले तरी त्याचा रागाचा पारा चढत असतो... असे मग मानापमान रंगत जाते... ही भूमिका चिन्मय जोगळेकर याने फार अप्रतिम केली आहे..



नटसम्राट बालगंधर्व

मग भामिनी आपली चूक कशी सुधारते, धैर्यधराला भामिनी कुठे भेटते, त्यांचे मिलन कसे होते, लक्ष्मीधर आणि विलासधर यांचे खुमासदार संवाद कसे रंगतात... या प्रश्नांची उत्तरे आपल्याला हे नाटक पाहिल्यावर, अनुभवल्यावर मिळतील... तर परत येईल तेव्हा जरुर हे नाटक पहा... एका पेक्षा एक सुंदर पदे, त्यांचे लयदार गायन... या तालासुरांच्या सुरेल वर्षावात श्रोते न्हाऊन निघाले... अनेक पदांना वन्स मोअर मिळाला, गायकांनीही एक कडवे परत म्हणून श्रोत्यांचा मान राखला... सहकलाकारांची कामे पण या दोघांना अनुरूप उत्तम झाली आहेत... आयोजक श्री प्रदीपजी रास्ते, दिग्दर्शक, प्रायोजक तसेच सर्व कलाकारांचे हार्दिक अभिनंदन आणि खूप खूप शुभेच्छा... हा असा सुंदर स्वरानुभव आपण सर्वांनी जरुर घ्यावा...

**सौ स्वामिनी जीवन बाबतीवाले**



# आज



आज सकाळी जाग आली तीच मुळी पावसाच्या आवाजाने, एकच जोरकस सर आली आणि रस्ते भिजवून गेली,रस्त्यावरचे पथ दिवे केव्हाच मालवलेत, आणि अगदी अंधुक रस्ता दिसतोय,प्रकाश कणभरच आहे,पण झुंझुरका आहे, आकाश आणि हवा काळवंडलेलीच आहे.बाहेर पडायचे की नाही हा विचार करत्ये,हात लांब करून पावसाचा अंदाज घेत्ये,हातावर चिमुकले थेंब पडतायत,तप्त भूमीवर पडलेल्या थेंबांनी मातीतले अत्तर सर्वदूर पसरलय. बांबूच्या झाडाची एक लांबसडक फांदी पूर्ण पिवळी पडलीय,त्या काळसर अंधारात ती उठून दिसतेय,पलीकडची कण्हेर लालबुंद फुलांनी डवरलीय,जास्वंदीच्या पानाच्या कातरकडा हळव्या हळव्या होऊन गेल्यात.रसवंत फणसाच्या काट्या मध्ये पाण्याचे थेंब अलगद जाऊन बसलेत.मळलेली कढीलिंबाची पाने स्वच्छ झाल्येत.लिंबाच्या झाडावर एक नुक्त जन्माला आलेलं बाळ आहे..छोटा पाचूचा मणीच जणू..असं त्याचं गोंडस रूप आहे.त्याचा हा पहिलाच पाऊस आहे,त्या पावसाच्या थेंबानी पण त्याला अगदी हळूवार स्पर्श केलाय. कुंपणावरच्या वेलींवरून पाण्याची स्मितरेषा ओघळतेय.पेरूच्या नुकत्याच फुटलेल्या चिमुकल्या पालवीवर जणू रेशमाची लड असावी तसं पाणी ओघळतय. सीताफळाच्या झाडाच्या पानमध्यावर पाण्याची एकसंध रांगोळी दिसतेय,त्यातला एकेक टपोर थेंब स्वतःचे वेगळे अस्तित्व दाखवतोय.आंब्याच्या मोहोराला हलक्या गुदगुल्या झाल्यात आणि पानांनी तर इदम न मम असं म्हणून भुईवर अर्घ्य सोडलय नारळीच्या झावळ्यानी केशवाय नमःअसं म्हणून आचमनच घेतलंय,लाल चाफ्यानी आपल्या पानांची ओंजळ करून ते पाणी त्यात साठवून ठेवलंय.जांभळी वेड्यावाकड्या फांद्या फैलावून अंगणभर सावली देत्ये,तिच्या काळ्या करड्या बुंध्यावर आणि फांद्यांवर दमलेले थेंब विश्रांती घेत पहुडलेत.तिची उन्हाच्या भगभगीने तलखी झालेली पानं सुखावल्येत. खारीचं छोटं पिल्लू आपल्या मण्यासारख्या काळ्याभोर डोळ्यातले औत्सुक्य लपवू शकत नाहीये,तोंडातून सतत चुकचुक आवाज काढत,आपली गोंडेदार शेपटी मजेत हलवतय.

पोपटांच्या भराऱ्या चालू झाल्यात,त्यांच्या शेपटीच्या पिसाची कातर नक्षी अगदी ठळक दिसत्ये.साळुंक्या भिरभिरताना त्यांचे पांढरटसर पोट लख्ख दिसतय. बुलबुलनी आपला डौलदार तुरा सावरत झुडपाच्या आत दडी मारलीय,

आकाशातलं काळसरपण आता कमी होत चाललंय,मळभी हवेची गारूड करणारी जादू संपत चाललीय.मंद लयीवर झुलत राहिलेला अंधार आता द्रुत गतीने नाहीसा होतोय.आता उजाडलय...लख्ख लख्ख उजाडलय....

**ऋचा सावरकर**

## उत्सव माझ्या दारी



**अर्पिता थत्ते**



**निकेता वालावलकर**



# संस्कृतीचं झाड जितकं खोल, तितकं समाजाचं नातं मजबूत!



आपली दक्षिण आशियाई संस्कृती म्हणजे खरं तर एक विस्तीर्ण, खोल आणि समृद्ध वारसा आहे — शेकडो वर्षांची परंपरा, तत्त्वज्ञान आणि सामाजिक जीवन यात मिसळलेलं आहे. ही संस्कृती समजून घ्यायची असेल, तर आपण “Culture Tree” म्हणजेच संस्कृतीचं झाड हा सुंदर दृष्टांत वापरू शकतो. हा विचार Zaretta Hammond यांनी दिला आहे, आणि तो culturally responsive teaching म्हणजे सांस्कृतिक जाणिवेवर आधारित शिक्षणात वापरला जातो.
या झाडाच्या तीन पातळ्या आहेत — वरची पातळी (Surface), मधली पातळी (Shallow) आणि सर्वात खोल मुळे (Deep Culture). चला, या तीन थरांमध्ये आपली संस्कृती थोडी खोलवर पाहूया.

🌿 वरची पातळी – दिसणारी संस्कृती

ही पातळी म्हणजे आपल्या दैनंदिन जीवनात दिसणाऱ्या सगळ्या गोष्टी — उत्सव, पोशाख, अन्न, संगीत, नृत्य, या सगळ्यांचा समावेश यात होतो.
अन्न: उदाहरणार्थ :बिर्याणी, डोसा, चहा, मिठाई इत्यादि— प्रत्येक प्रांताची स्वतःचं खास खाद्य वैशिष्ट्ये.
वेषभूषा: उदाहरणार्थ: साडी, सलवार कमीज, धोतर, पगडी इत्यादि— हे फक्त पोशाख नाहीत, तर त्यांच्यामागे सौंदर्य आणि प्रतीकात्मक अर्थ दडलेला असतो.
संगीत आणि नृत्य: भरतनाट्यम, हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत, भांगडा, गरबा आणि अर्थातच बॉलिवूड इत्यादि— ही सगळी आपली जिवंत, रंगीत ओळख आहे.
पण एवढ्यावरच थांबलो, तर आपण केवळ पानाफुलांवरून झाड ओळखतो — मुळं मात्र अजून खोलवर आहेत.

🌊 मधली पातळी – न बोललेले सामाजिक नियम

या थरात आपल्या समाजातले अघोषित नियम येतात — जे आपण पाळतो, पण शब्दांत नेहमी सांगत नाही.
उदाहरणार्थ : वडीलधाऱ्यांचा आदर: कुटुंबात मोठ्यांचा सल्ला, त्यांचा मान — हा आपल्या घराघरात खोलवर रुजलेला संस्कार आहे. वेळेची समज: वेळेबद्दल आपली दृष्टी थोडी लवचिक असते — संबंधांना अधिक महत्त्व, वेळेपेक्षा माणसाला प्राधान्य.
देहबोली: उदाहरणार्थ :डोळ्यात डोळे घालून न बघणे म्हणजे, कधी कधी तो आदराचा भाव असतो.
लिंग भूमिका (Gender Roles) आणि स्पर्श:, पुरुष–स्त्री संवाद, शारीरिक अंतर(personal space) यावर परंपरा आणि धर्माचा प्रभाव दिसतो. ही पातळी समजल्यास, आपण चुकीच्या समजुतीऐवजी खरी भावना ओळखू शकतो.


🌳 सर्वात खोल मुळे – आपल्या मूल्यांचा पाया

ही पातळी म्हणजे आपल्या विचारांचा आणि श्रद्धेचा गाभा. इथं आपल्या जगाकडे पाहण्याची दृष्टी तयार होते.

आध्यात्मिकता: कर्म, धर्म, मोक्ष — ही संकल्पना जीवनाचा अर्थ आणि नैतिकतेची दिशा ठरवतात.
आरोग्याची दृष्टी: आयुर्वेद, योग — शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल राखण्याचा प्रयत्न.
समूहभावना आणि कर्तव्य: व्यक्तीपेक्षा कुटुंब, समाज, एकत्रित जबाबदारी यांना अधिक महत्त्व.
पिढ्यानपिढ्या आलेलं ज्ञान: कथा, म्हणी, परंपरा — या सगळ्यातून आपल्या संस्कारांचं बीज पुढे जातं.
याच मुळांमुळे आपली जीवनशैली, पालकत्व, संघर्ष हाताळण्याची पद्धत आणि समुदाय भाव तयार होतो.

🌱 हे झाड का महत्त्वाचं आहे?

संस्कृतीचं झाड आपल्याला सांगतं की संस्कृती फक्त बाह्य रूप नसते — ती आतून जगलेली असते.
हे समजून घेतल्याने शिक्षक, आरोग्यसेवक, पोलीस अधिकारी, आणि समुदाय नेते सगळ्यांनाच फायदा होऊ शकतो.
आपण हे संस्कृतीचे झाड कसे वापरू शकतो?
फक्त बाह्य रूपावर थांबून न राहता, संस्कृतीच्या खोल अर्थाला समजून घेऊ या
लोकांच्या सूक्ष्म आणि अव्यक्त मूल्यांचा आदर करून त्यांच्यात विश्वास निर्माण करू या
तसेच असे सर्वसमावेशक कार्यक्रम तयार करूयात , जे लोकांच्या प्रत्यक्ष अनुभवांवर आधारित असतील.
जेव्हा आपण या तीनही पातळ्यांकडे संवेदनशीलतेने पाहतो आणि या झाडाची सिद्धांतात्मक माहिती वापरतो, तेव्हा समाजात खऱ्या अर्थाने आदर, समज आणि संवादाची वाढ होते. या नव्या दृष्टीकोनातून आपण केवळ आपल्या संस्कृतीकडेच नव्हे, तर इतरांच्या संस्कृतीकडेही पाहुयात .
या दीपावलीत, जेव्हा आपण दिव्यांची झळाळी पाहतो आणि घरभर आनंद पसरतो, तेव्हा लक्षात ठेवा — संस्कृतीचा प्रकाश फक्त बाह्य शोभा नाही; तो आपल्या इतिहास, मूल्ये आणि जीवनशैलीचा साक्षीदार आहे. संस्कृतीच्या झाडाद्वारे आपण हा प्रकाश खोलवर अनुभवू शकतो.
हाच संदेश आपल्या “Culture Tree” चा आहे — संस्कृतीचं झाड जितकं खोल, तितकं समाजाचं नातं मजबूत!




Used with permission of Corwin, a SAGE Publications, Inc company

**डॉ. सायली अमरापूरकर**



# टीका(खोर)!



त्याकाळी मी अमेरिकेत नुकतीच आले होते. बहिणीबरोबर आणि तिच्या नवऱ्याबरोबर त्यांच्या घरी राहत होते. बहीण मीना युएसएमएलईचा म्हणजे युनाइटेड स्टेटस मेडिकल लायसेन्सिंग परीक्षेची तयारी करत होती. त्यासाठी ती रोज कॅप्लन नावाच्या संस्थेत जाऊन दिवसभर अभ्यास करायची. तिचा नवरा अमित आणि मी एकाच कंपनीत होतो. संध्याकाळी ऑफिसमधून मी घरी जायची आणि रात्रीचा स्वयंपाक करायची. अमित मीनाला घ्यायला कॅप्लनमधे जायचा. भारतात एम.डी.ची पदवी मिळवून सुद्धा इथे परत तीच पदवी मिळवायची म्हणजे परत घोर अभ्यास करावा लागत होता. बिचारी मीना! अगदी कंटाळून गेली होती पण नाईलाज होता.

रात्री सगळे मिळून जेवायला बसायचो. रोज मी पोळी, भाजी, आमटी, भात, कोशिंबीर असा साग्रसंगीत स्वयंपाक अगदी हौशीनं आणि प्रेमानं करायची. घडीच्या पोळ्या तर मी अगदी मन लाऊन करायची. हिंदी आणि मराठी गाणी ऐकताऐकता कणकेचा छोटा गोळा थोडा लाटायचा, त्याला तेल लावायचं, दोनदा घडी घालायची, मग तो त्रिकोणी तुकडा लाटूनलाटून त्याची गोल पोळी करायची आणि तेल लाऊन छान खरपूस भाजायची! आणि हे सगळं करताना नुकतंच सोडलेलं पुण्यातील आयुष्य, मागे एकटे राहिलेले आईबाबा आणि अमेरिकेऐवजी ऑस्ट्रेलियाला परत गेले असते तर, असल्या गोष्टींचं चिंतन करत स्वयंपाक व्हायचा. माझं मन अजून मेलबर्नमधे रेंगाळत होतं.

साधारण एका महिन्यानंतर रात्री जेवताना मीना म्हणाली, “पोळीच्या कडा कच्च्या आहेत. जरा आणखी भाजत जा ना”. मला लाजल्या सारखं झालं. आणि रागही आला. राग तर नेहमी माझ्या नाकाच्या शेंड्यावरच असायचा! हिला रोज ताजं आणि गरमगरम जेवण मिळतं आहे आणि ही माझे आभार मानण्याऐवजी माझ्यावर टीका करते आहे! अमितला फुलके खाऊन सवय होती. फुलके गॅसवर धरले की टम्मं फुगतात आणि सगळीकडून नीट भाजून निघतात. पण पोळ्या अश्या भाजत नाहीत. नक्कीच हे अमितनं मीनाला सांगितलं असणार त्याच्या नेहमीच्या मजेदार शैलीत, “अपनी बहेनसे कहो ना”! अमितची आत्ता कुठे ओळख होत होती म्हणून मी मनातल्या मनात त्यालाच दोष देऊन मोकळी झाले.

पुण्यातल्या टेल्को (म्हणजे आताच्या टाटा मोटर्स) कंपनीत कॅन्टीनमधे मिळणाऱ्या पोळ्यांचं प्रकरण आठवलं. कँटीनमधे देण्यात येणाऱ्या काही पोळ्या पण कडेपर्यंत नीट भाजलेल्या नसायच्या. संपूर्ण जेवण आणि एक केळं एक ६० पैश्याचं कूपन देऊन मिळायचं म्हणून लोक सर्रास अधिक पोळ्या मागायचे आणि त्यांचा अर्धाअधिक भाग नीट न भाजलेला भाग टाकून द्यायचे. मग बहुतेक टेल्को गृहिणी मधे पोळ्या करणाऱ्या गृहिणींना तंबी मिळाली असेल कारण रोज तिथून ट्रकमधून चार वेळा देण्यात येणाऱ्या जेवणासाठी येणाऱ्या हजारो ताज्या पोळ्या काही महिन्यांनी सुधारल्या.

हे सगळे विचार आकाशात हस्तनक्षत्रात जोरात जमणाऱ्या ढगांसारखे एकदम जमले आणि पुढे येणारे माझ्या रागाचे वादळ थांबवण्याच्या दृष्टीने मी म्हणाले, “लहानपणी बालभारतीत वाचलेली श्यामच्या आईची ही साने गुरुजींनी लिहिलेली गोष्ट मला अजून आठवते. तुला आठवते का गं मीना?” मीनानं डोकं हलवलं. तिला कधीच असल्या गोष्टी आठवत नाहीत. का तर म्हणे फालतू गोष्टींनी आपला मेंदू का भरायचा? मेंदूतील जागा महत्वाच्या गोष्टींकरता रिकामी ठेवावी! मग मी अमितसाठी हिंदीत ती गोष्ट सांगितली, “एकदा श्यामची आई रताळीच्या पाल्याच्या भाजीत मीठ घालायला विसरली. मुलं आणि त्यांचे वडील जेवायला बसले. पहिला घास घेतला आणि श्यामच्या लक्षात आले की भाजीत मीठ नाही. त्याने वडिलांकडे पहिले पण ते काही नं बोलता जेवत होते. कोणीही आईला सांगितले नाही की भाजीत मीठ नाहीये. कसेबसे सगळ्यांचे जेवण उरकले. सगळ्यांनंतर आई जेवायला बसली.

भाजी खाताच तिला कळले की भाजीत मीठ नसताना कोणीही तोंडातून ब्र काढला नव्हता. ती श्यामला म्हणाली, 'अरे भाजी अळणीच खाल्लीस! तरीच मला समजत नव्हतं की तू एवढीशीच भाजी का खाल्लीस! सांगायचं नाही का मला?' आणि तिला रुखरुख लागून राहिली.
मी बोलायची थांबले आणि दोघांकडे अपेक्षेनं पाहू लागले. दोघंही जेवण्यात मग्न होते. थोड्या वेळानं मीनाच्या लक्षात आलं की मी बोलायची थांबले आहे आणि काही अपेक्षेनं त्यांच्याकडे पाहत आहे.
ती म्हणाली, "मग?" मी डोक्यावर हात मारला आणि गोष्टीचं तात्पर्य श्यामच्या वडिलांच्या दृष्टीकोनातून सांगितलं, "श्यामच्या आईने इतक्या खटपटीने चुलीजवळ धुरात बसून स्वयंपाक केला होता. तो गोड करून खावा, त्यात दोष पाहू नये, स्वयंपाक कारण्याऱ्याचे मन दुखवू नये". दोघे ही खोखो हसत सुटले आणि मी पण राग विसरून हसू लागले. आणि तेव्हापासून असं काही घडलं की ते दोघं "श्यामची आई का?" असा मिश्किल प्रश्न मला विचारू लागले.

ह्या गोष्टीला बरीच वर्षं झाली आणि आता मीना म्हणते की तिला ही घटना आठवतच नाही!


खरंच का माणसानं साने गुरुजींच्या ह्या विचाराप्रमाणे वागावं? मी अळणी भाजी आणि ती सुद्धा अळणी पालेभाजी खाऊ शकेन का? अजिबात नाही! मी कुठलाच पदार्थ मिठाशिवाय खाऊ शकत नाही. मीठ, तिखट, मसाला - सगळं कसं बरोब्बर असलं पाहिजे! मिठाच्या बाबतीत एक सत्यघटना आठवते. रशियात स्टालिनच्या हुकूमशाहीत एका सनातनी ख्रिश्चन पंथाचे लोक सायबेरियाच्या टायगा प्रदेशात १९३६ साली नाहीसे झाले. स्टालिनपासून आपल्याला आणि आपल्या धर्माला वाचवण्याकरता त्यातील लायकॉफ कुटुंबाने चाळीस वर्षं अज्ञातवासात घालवली. १९७८ साली काही भूगर्भशास्त्रज्ञांना त्यांचा शोध लागला. शास्त्रज्ञांनी त्यांना विचारलं की तुम्हाला कुठल्या गोष्टीचा अभाव सगळ्यात जास्त जाणवला तर ते म्हणाले "मीठ". त्यांना दिलेल्या बऱ्याच भेटवस्तू त्यांनी नाकारल्या; फक्त मिठाचा स्वीकार आनंदाने केला.
दुसरी गोष्ट म्हणजे ज्या चुका दाखवल्या जात नाहीत त्या सुधारता येत नाहीत. जर मला मीनानं पोळीच्या कडा भाजल्या नाहीत हे जर सांगितले नसते तर मी आयुष्यभर पोळ्या तशाच केल्या असत्या. तिनं सांगितलं म्हणून माझा स्वयंपाक सुधारला. पण मुख्य म्हणजे दुसऱ्यांना जर आपल्यावर टीका करायला आपण परवानगी दिली नाही तर आपण त्यांच्यावर कशी टीका करू शकणार? आणि माझी प्रवृत्ती समीक्षकाची किंवा टीकाकाराची असल्यामुळे टीका केल्याशिवाय मला राहवत नाही. खरं म्हणजे मला 'टीकाकार' ह्या उपाधीपेक्षा 'टीकाखोर' ही उपाधी जास्त शोभून दिसते! सुदैवाने माझ्या व्यवसायात विश्लेषण आणि टीका महत्वाची आहे म्हणून बरं आणि दुर्दैवाने 'टीकाखोर' हा शब्दच मराठीत नाही!

टीका म्हणजे वाईट, कुचेष्टा, शब्दच्छल, निर्भत्सना असे नाही. टीका सकारात्मक आणि विधायक पण असू शकते. आजकाल तर आपण कुठलाही निर्णय गूगलवरचं समीक्षण वाचल्याशिवाय करत नाही. अनेक वेबसाइट्स केवळ लोकांच्या अभिप्रायावर चालतात. फक्त ह्या अभिप्रायाला किंवा टीकेला आपण कसा प्रतिसाद देतो ह्यावर बरंच काही अवलंबून असतं.


आम्ही एकदा फीनिक्सला गेलो होतो. तिथं स्थायिक असलेल्या माझ्या मित्राच्या कॉलेजमधे असलेल्या तरुण मुलाला आम्ही रात्री जेवायला घेऊन जाणार होतो. तो म्हणाला की अमुकतमुक रेस्टरॉन्ट भारतीय जेवणासाठी चांगलं आहे. आम्ही लगेच त्या रेस्टरॉन्टचे 'गूगल रिव्हयु' वाचले. त्यातले बरेचसे रिव्हयु वाईट होते पण ते सगळे तिथे मिळणाऱ्या सेवेबद्दल होते. आणि कहर म्हणजे असल्या प्रत्येक वाईट अभिप्रायाला रेस्टरॉन्टच्या मालकाचं एकच उत्तर होतं - जर तुम्हाला आमचं रेस्टरॉन्ट आवडत नसेल तर इथे परत येण्याची गरज नाही. तुम्हाला भारतीय जेवण आणखी कुठेही मिळेल. हे वाचून माझा नवरा अँड्रू एकदम उडालाच! म्हणाला, "काय उद्धट माणसं आहेत! किती अहंकार! असं चालवतात का रेस्टरॉन्ट? आपण दुसरीकडे जाऊ". पण मित्राचा मुलगा म्हणाला की इथलं जेवण अगदी चांगलं आहे, तुम्हाला खरंच आवडेल. आम्ही तिथे गेलो आणि जेवण खरंच अप्रतिम होतं! रेस्टरॉन्टमधे फारसे लोक नव्हते तरी पाणी आणि मेन्यु आणायला वेटरनं खूप वेळ लावला. एकंदर प्रकरण जरा सुस्तच होतं. पण सगळे पदार्थ इतके चांगले होते की आम्हाला तक्रार करायला जागाच नव्हती!

कधीकधी आयुष्यात येणाऱ्या प्रत्येक क्षणाचा फक्त आस्वाद घ्यावा; टीका करून जग सुधारायचा प्रयत्न करू नये!

**वासंती मुदकण्णा**



# उठा , उठा दिवाळी आली,
# 'मोती' स्नानाची वेळ झाली



दूरचित्रवाणीवरील ही जाहिरात पाहिली की, सानथोर मंडळींना ' दिवाळी ' चे वेध लागतात.
मग घरादाराला चैतन्य येते. घराच्या स्वच्छते बरोबर मनातील जळमटेही दूर होतात.
लक्षदीपांच्या रोषणाईने घरअंगण ऊजळून निघते. आकाशकंदीलाची झिरमिळ घराची शोभा वाढवते. दारापुढील संस्कारभारतीची नक्षीदार रंगीत रांगोळी घरात येणाऱ्या लक्ष्मीपावलांचे स्वागत करीत असते.अशा या प्रकाशाने ऊजळून टाकणाऱ्या मोठ्ठ्या सणाची आपण आतुरतेने वाट बघत असतो.
आमच्या लहानपणी आमची ही आठवणीतील ' सांदण  दिवाळी ' आजही अत्तराच्या कुपीप्रमाणे आमचे अन सुगंधीत करत असते.
लाविते मी, निरांजन तुळशीच्या पायापाशी ,
भाग्य घेऊनीया आली आज ' धनत्रयोदशी ' !
माणिक वर्मांच्या गोड आवाजातील हे गाणे आकाशवाणीवर ऐकायला आले की, आमच्या दिवाळीची चैतन्यमयी पहाट व्हायची .
' नरकासुर वध आख्यान' ऐकता ऐकता सुंगधी तेल उटणे लाऊन ऊष्णोदकाने अभ्यंग स्नान घडायचे. त्या निमित्ताने आई , आजीचा तो मायेचा हात अंगावरुन फिरे. औक्षणाच्या निरांजनी आईच्या नयनी भासत असत.गाण्यातील बोलाप्रमाणे आईसाठी आज मन खंतावतं !
त्यानंतर वर्षाकाठी मिळणारे दोनचार नवीन कपडे अंगावर घालून फटाके ऊडवण्याची गडबड असायची. भावंडांमधे फटाक्यांची वाटावाटी असायची. मोठी भावंडे शूरविराचा आव आणून सुतळी बांम्ब फोडायचे. तर आम्ही बापुडे लवंगी माळैची लड पेटत्या कागदावर ठेउन फटाके फोडण्याचा आनंद घ्यायचो. दुसऱ्या दिवशी फुटलेल्या फटाक्यातुन न फुटलेले फटाके शोधुन पुन्हा हातात घेउन ते फोडण्याची धाडसी मोहिम असायची. फुलबाजीचे रिंगण फिरवायचे ,भुईनळीचा भोवरा फिरायचा, कोठीच्या झाठातुन चांदणफूले जमिनीवर टपकायची ,आकाशी रॉकेट ऊडवायचे ,सापगोळीतुन धूर काढायचा ,आपटबार मारायचा अशी मजा करायला मिळायची.  फटाके ऊडउन झाल्यावर आमची स्वारी आई ,आजीने केलेल्या खमंग खुसखुशीत फराळावर ताव मारायची. शेजारी पाजारी  चिवडा ,चकली ,शेव ,शंकरपाळी लाडु अशा फराळानी ताटं भरुन पाठवायची .कोणाची चकली कशी फसली याच्या गमतीजमती व्हायच्या.  एकत्रकुटुंबामुळे हे सारे हसतखेळत होत असे.आजकालच्या विभक्त कुटुंबात हे क्षण दुर्मिळ झालेत .
वसुबारसेच्या दिवशी गायवासराची पूजा करून प्राणिमात्राविषयी कृतज्ञता
 व्यक्त करुन दिवाळीचे पाच दिवस धम्माल असायची.
पाडव्याला मंदिरात जाणे , देवाला कोरी पणती लावणे ,मारुतीला तेल वहाणे अशा पारंपारीक संस्कारांनी भारलेली दिवाळी आठवणीत आहे.
चारही दिवस पक्वान्नाची भोजने करून तृप्त मने डुलकी घ्यायला तयार !
तर अशीही आठवणीतील "सांदण दिवाळी "
अत्तराच्या कुपीप्रमाणे आजही मन सुगंधीत करत असते.
पुढे सासरी आल्यावर जबाबदारीच्या जाणिवेने दिवाळी दिमाखदार होऊ लागली . बिसमिलाखाँच्या सनई वादनाच्या सुरावटीने दीपावली भाराउन गेली .लक्ष्मीपूजन, पाडवा सौभाग्य सूख देत गेला. भाऊबीजेला भावाच्या भेटीची ओढ लागत गेली .
फटाक्यांना घाबरणारी माझी लहानगी मुले कशी आई आजीच्या पदराआड लपायची हे आठऊन हसु येते.
आजकालच्या ' डिझीटल युगात 'दिवाळी ही रेडीमेड ,इन्स्टंट गोष्टींनी सुशोभित केली जाते.
पर्यटनाची आवड निर्माण झाल्याने बहुतांशी मंडळी दिवाळीत प्रेक्षणीय स्थळी किंवा धार्माक स्थळी पर्यटनाला जातात.
आनंदासाठी सारे काही !
हे मात्र खरे की, आजची पिढी पारंपारीकता जपत नव्या विचारांनी दिवाळी संस्कार पूढच्या पिढीला देत आहे. जुने ते सोनं असलं तरी नवं तेही स्विकारावं !

अभ्यंग स्नानाबरोबर या पिढीला 'दिवाळी पहाट' गाणी ऐकण्याची आवड आहे.येथे दिव्यांची रोषणाई होते. विविध आकाशकंदिलांचा झगमगाट होतो लक्ष दिव्यांच्या रोषणाईने डोळे दिपुन जातात. .संस्कारभारतीच्या रंगीत नक्षीदार रांगोळ्यांनी लक्ष्मीचे स्वागत होते. फटाक्यांची आतषबाजी होते. गुलाब पुष्पगुच्छांनी फुलदाणी सजते.घरात रेडीमेड फराळाची रेलचेल असते. मिठाईचे बॉक्सैस घरात येतात असे सर्व आलबेल आहे. पण वर्षभर विनासायास सर्व मिळत असल्याने दिवाळीचे नाविन्य थोडे कमी वाटते.
डाएटचे खूळ डोक्यात असल्याने वजन वाढीच्या भातीपोटी दिवाळीच्या खमंग खुसखुशीत पदार्थ मनसोक्त खायला मर्यादा आली.पारंपारीक पदार्थांपेक्षा चायनीज ,पंजाबी ,कॉन्टिनेन्टल पदार्थांची आवड निर्माण झाली. त्यामुळे ताव मारुन पदार्थ खाल्ला जात नाही यामुळे.दिवाळीची गोडी अम्मळशाने कमी झाली नाही का ? प्रदुषणाविषयी जागरुकता आल्याने फटाके फोडण्यालाही मंडळी ऊत्सुक नाही राहीली असो. कालाय तस्मै नमः !
' ईडा पिडो टळो ,बळीचे राज येवो ' म्हणत साजरी होणारी, 'दिन दिन दिवाळी ,गाई म्हशी ओवाळी ' असे सांगणारी लखलख तेजाची प्रकाशाची सुंदर दिवाळी ' पणती-ज्योती 'ची मानकरी आहे. दारापुढे ऊजळलेले दिवे ,परसदारी तुळशीवृंदावनाला ठेवलेली पणती सारे काही मंगल ,पवित्र, आशयघन !

अशी ही दीपोत्सवाची दिवाळी
मनाला खूप खूप भावली
हर्ष ,ऊल्हास तीच्या आगमनी
मोदही वाटतो मनोमनी !
तीच्या प्रकाशे सरो आपदा
लक्ष्मीपाऊले मिळो संपदा !
शुभम् भवतु !







**जयश्री मुळे**



# इच्छाशक्ती



तुम्ही कधी मॅनिफेस्टिंग केलय का ? किंवा मॅनिफेस्टिन्ग चा अनुभव घेतलाय का ? माझ्या मते जर आपल्याला एखादी गोष्ट अगदी मनापासून हवी असेल, आपली विलपॉवर स्ट्रॉंग असेल तर ते घडून आणण्यासाठी काय करावे लागते  ह्याच अगदी जिवंत उदाहरण म्हणजे माझी तनिष्का !! आमच्या लग्नाच्या 3 वर्षानंतर आम्ही फॅमिली प्लांनिंग सुरु केला.  4-5 IUI करूनही अपयश, मग पहिल्या IVF ला आशेचा किरण दिसू लागला आणि मला दिवस गेले पण हे आनंदाचे क्षण फक्त 6 आठवडे , ऍबनॉर्मल प्रेग्नन्सी मुले D&C (डायलेशन अ‌ॅंड क्युरेटाज) करावा लागला आणि त्याच्या काही दिवसानंतर पोटात दुखायला लागल, अल्ट्रासाऊंड मध्ये लक्षात आला कि एक्टोपिक्स प्रेग्नन्सी आहे जे वेळेवर लक्षात आला आणि लगेचच डावी गर्भनलिका काढावी लागली. त्यानंतर लगेचच आमच अमेरिकेत येणं झाला . नवीन देश , नवीन डॉक्टर्स .. आशा काही मी सोडली नाही ..आता इथल्या क्लीनिकस च्या चकरा सुरु झाल्या . पुन्हा ट्रीटमेंट्स , नवीन डोस , इंजेक्सशन्स , अल्ट्रासाऊंड्स हे सगळं आयुष्याचा अविभाज्य घटक बनून गेला. इतके एफोर्टस घेऊन नॅचरली प्रेग्नन्ट होऊ लागले . जवळ जवळ 5 ते 6 वेळा D&C (डायलेशन अ‌ॅंड क्युरेटाज) करावी लागली , कारण अज्ञात !! डॉक्टर्स बदलले , क्लीनिकस हॉस्पिटल्स सगळं बदलून पहिला पण कारण अज्ञात !! मग मात्र होप्स सोडून दिले मी आणि मूल दत्तक घ्यायचा विचार केला भारतात जाऊन .. तेही इतक सोप नव्हे . कोविड चा काळ सुरु झाला आणि मग अजून होप्स कमी झाले . पण अजूनही मनापासून मूल होणार आहे अशी इच्छा सदैव होती. योग असा कि माझ्या चुलत भावाने Dr राऊत ह्या ह्यांच्या इम्युनोथेरॅपी बद्दल सांगितलं . आधी आम्ही लाइटली घेतल मग वेबसाईट वर जाऊन सगळी माहिती वाचली आणि ऑनलाईन consulation करून भारतात जाऊन हे LIT ( लिंफोसाइट इम्म्युनिझशन थेरेपी )करायचा विचार केला . खरतर दाताची ट्रीटमेंट प्राथमिक कारण आणि इम्युनोथेरॅपी दुय्यम असा होता ..


सुदैवाने मला ट्ट्रीटमेंटच्या एका महिन्यातच दिवस गेले आणि माझा मॅनिफेस्टेशन खऱ्या अर्थानं सुरु झाला . सुरवातीचे काही महिने टेन्शन मध्ये गेले पण मन खंबीर ठेवला होता . प्रत्येक दिवशी सकारात्मक राहिले , मी 9 महिने रोज पोटावर अगदी आनंदाने इंजेकशन घेतला, काही कठीण प्रसंग येऊनही गेले पण मी नेहमीच पॉझिटिव्ह राहिले आणि रोज स्वतःला म्हणत होते कि माझी काहीही त्रास ना होता व्यवस्थित डिलिव्हरी होणारच आहे आणि तसच झाल .वेट वॉज ओव्हर !! 10 वर्षाच्या तपश्चर्येचा फळ मिळाला !! 14 ऑक्टोबर 2022 ला तनिष्काचा जन्म झाला !!!! माझी इच्छाशक्ती हे हि सांगत आहे कि माझा लेख वाचून किमान 1 जण तरी आपल्या विलपॉवर ने इम्पोससीबल ला पॉसीबल करू शकतो !! नाही का ?

**दीप्ती मुसळगावकर**

**स्वप्न सत्यात उतरलं —**
**मी माझा पहिला मॅरेथॉन पूर्ण केला!**



**सान्वी जाधव**



**सान्वी पाटवर्धन हिने आपल्या पहिल्याच स्पर्धेत — “Robin Lee Ice Skating Tournament 2025, St. Louis Park” — मध्ये Figure Skating (Basic Level-4) प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला आहे**

# ।। किल्ला ।।



दिवाळीची सुट्टी म्हटली की डोळ्यांसमोर कितीतरी आनंददायी गोष्टी उभ्या राहतात, फटाके, फराळ, नवे कपडे, खेळ आणि सगळ्यात आवडते म्हणजे किल्ला बनवणे! लहानपणी माझ्यासाठी दिवाळीत किल्ला बनवणे हे एक अत्यंत महत्त्वाचे काम असायचे.
आम्ही अमेरिकेत आलो तेव्हापासून आरवसोबत किल्ला बनवायचं अनेकदा ठरवलं, पण अपार्टमेंटमध्ये राहात असल्यामुळे ते कधी शक्यच झालं नाही. मात्र गेल्या वर्षी आरव बरोबर शिवाजी महाराजांवरचं एक पुस्तक वाचलं आणि त्याला किल्ल्यांबद्दल प्रचंड कुतूहल वाटू लागलं. त्यावेळी मी त्याला माझ्या लहानपणी आजी-आजोबांकडे दिवाळीच्या सुट्टीत आम्ही कसे किल्ले बनवायचो, भावंडांसोबत कशी मजा करायचो, हे सगळं सांगितलं. ते ऐकून आरव लगेचच म्हणाला, “आपण इथे अमेरिकेत पण किल्ला करायचा?”
मी ही होकार दिला आणि भारतात जाण्याच्या वेळी किल्ल्यासाठी लागणाऱ्या सर्व वस्तूंची यादी केली.
ऑगस्ट २०२५ मध्ये गणपतीसाठी आम्ही भारतात गेलो तेव्हा आरवला सांगितलं की किल्ल्याच्या सजावटीसाठी सैनिक आणि चित्रं घेऊयात. पण त्यावेळी कुंभारवाड्यात (पुणे) अजून दिवाळीच्या किल्ल्याची सजावट करण्यासाठीच्या गोष्टी बाजारात आलेल्या नव्हत्या. काही दुकानदार म्हणाले, “किल्ल्याची चित्रं गणपती सजावटीसाठी लोकांनी आधीच खरेदी केली.” हे ऐकून आरव थोडा नाराज झाला. मी त्याला समजावलं , “आपण पुन्हा येऊ, नक्की मिळतील.”
आठवड्याने पुन्हा गेलो, आणि यावेळी आम्हाला सुंदर चित्रं मिळाली! आरवचा चेहरा आनंदाने उजळला, आणि आम्हालाही खूप समाधान वाटलं.
१०-११ सप्टेंबरला आम्ही अमेरिकेत परतलो. परत आल्यावर आरवची शाळा, आमचं ऑफिस या सगळ्या धावपळीत किल्ला कधी बनवायचा यावरच चर्चा चालू होती.
एक दिवस आरवने विचारलं, “बाबा, किल्ल्यासाठी काय काय लागेल रे?”
मी सांगितलं “मोठे दगड, सुतळीच्या दोऱ्यांची पिशवी, माती...” आणि मग दसऱ्यानंतर आम्ही सगळं सामान गोळा करायला सुरुवात केली.
अमेझॉनवरून सुतळीच्या दोऱ्यांची पिशवी (Potato Sack) मागवली, होम डिपोतून विटा घेतल्या, आणि माती बॅकयार्डमधून काढली. आम्ही ठरवलं, झाडाच्या बुंध्याचा आधार घेऊन किल्ला बांधायचा.
विटा आणि दगड एकावर एक रचून आधी एक मजबूत ढाचा तयार केला. मग सुतळीच्या पिशव्या पाण्यात भिजवून दगडांवर अंथरल्या आणि त्यावर मातीचा चिखल लावून किल्ल्याची भिंत तयार केली. बुरुज, दरवाजा आणि सैनिक ठेवण्यासाठी जागा केली.
शेवटी आमचा किल्ला पूर्ण झाला!
दिवाळीच्या पहिल्या दिवशी शिवाजी महाराजांची मूर्ती ठेवली, चित्रं सजवली आणि दिव्यांनी किल्ला उजळून निघाला. आमचा किल्ला खूपच सुंदर दिसत होता जणू काही माझं बालपण पुन्हा एकदा माझ्यासमोर उभं राहिलं होतं.
त्या क्षणी मी आरवकडे पाहिलं आणि म्हटलं,
“Thank you, आरव... या वर्षी अमेरिकेत किल्ला करून तू मला माझ्या बालपणात घेऊन गेलास !”





**संदीप गुंड**

MY HOME MORTGAGE LLC


612-450-3016

Make your Dream Home Realty

- Purchase
- Refinance (Cash out /Term)
- Investment loan

Licensed in FL, GA, MN & TX.

NMLS# 1986202 / 1278007



OVER 1000+ CUSTOMERS SERVED

**Rowdheer Reddy Kapidi**

Mortgage Broker/Realtor

612-810-7790

Rowdheer@myhomemort.com

www.myhomemort.com

EQUAL HOUSING LENDER

The key to unlocking your dream home

BRIDGE REALTY

AMERICAN FAMILY INSURANCE ®

www.amfam.com

**ROWDHEER KAPIDI** AGENT/OWNER

1405 Lilac Dr N #220, Golden Valley, MN 55422

Office: 763-398-8778

Cell: 612-810-7790

rkapidi@amfam.com

1-800-MyAmFam (1-800-692-6326)

KAPIDI & ASSOCIATES LLC




# ओढणी



दुडू दुडू चालत होती तेव्हा, मम्मीने कौतुकाने एका ओढणीची साडी करून तिला नेसवली होती .त्या ओंघळ पोंघळ साडीत चालताना सगळे तिच्याकडे बघुन हसत होते.. ती मात्र त्या ओढणीच्या मऊसुत स्पर्शाचा आनंद घेत होती ..तेव्हाच खरंतर तिची व ओढणीची घट्ट मैत्री होणार हे ठरल होत... शाळेला जायला लागली तर शाळेतल्या मोठ्या ताईंचे ओढणीवाले गणवेश पाहुन, त्यांनी त्या ओढणीने त्यांच्या गळ्यात काढलेला V पाहुन, आपल्याला अजुन 2 वर्षांनी ती भेटेल नक्की याची खात्री होती... पण दिवाळीला मला ओढणीवाला ड्रेसच हवा अशी फर्माईश तिने देऊन टाकली होती.. छोटुश्या दीड मीटर ओढणीचा ड्रेस तिला मिळाला पण.. ओढणी... भली मोठी व मऊसुत... अंगावर टाकताच आजीच्या पांघुरण्यातल्या उबेची आठवण.. आधी कौतुकाने आणि नंतर किशोरवयातील पदार्पणामुळे तिलाच येऊन चिपकली... आणि तिची व ओढणीची हळु हळु घट्ट मैत्री झाली... किशोरवयाच्या पाऊलखुणा लपवण्यासाठी... केस धुतल्यावर त्याचा अंबाडा करून वर टांगण्यासाठी.... उन्हाळी पापड कुरडई घालण्यासाठी... ताईच्या बाळाला बाळोते म्हणुन... आणि उरली सुरलीच तर फरशी पुसायला म्हणुन.... एक ना अनेक प्रकारे ती कामाला येत गेली...

एकमेकींना त्यांनी भरपुर साथ दिली... आईने तिला दिलेल्या रपट्यामुळे आलेल्या अश्रुनांही ओढणीने आपल्यामध्ये एकजीव केलं आणि कुणाला कानोकानी खबर होऊ दिली नाही... एका दिवाळीला तिघी बहिणींना सेम ड्रेस घेतला आईने, ते पण चांगली अडीच मीटर ओढणी पाहुन..... तिला आवडतो म्हणुन जांभळा कलर तिच्यासाठी वेगळा काढुन ठेवला.. ती हॉस्टेल ला राहत होती त्या वेळी.... आल्यावर ओढणीकडे पाहून भावुक झाली ती... परत तिची या नव्या ओढणीबरोबर तशीच घट्ट मैत्री झाली... लग्नानंतर हि ती तिच्याबरोबर गेली पण अमेरिकेत आल्यावर मात्र तीची व ओढणीची परत भेट झाली नाही.... भारतात इतक्या वर्षांनी गेल्यावर ओढणी आपल्याला भेटेल का अस वाटत असताना... तिची आई तिच्या बाळाला गुंडाळायला म्हणुन त्यांच ओढणीला सातासमुद्रापलीकडे घेऊन आली.... ओढणीला पाहुन तिचा आनंद गगनात मावेना.. बॅगेतून काढल्याबरोबर सर्वात आधी तिने स्वत:भोवती गुंडाळून घेतली ..अहाहा !!! हीच ती उब.... तिने बाळाला अंघोळ घातली व पटकन त्याच्या भोवती त्याला गुंडाळलं आणि म्हणाली.... तुला भेटायला कोण आलय माहितीय का ????? मावशी आलीय मावशी

**श्रद्धा कदम**



**1st place at the State National History Day Competition. This team was awarded for their research on the court case of Washington v. Harpe(1990) and the balance between individual autonomy and a State's responsibility to govern it.**




**शौर्या पाठक**











# सूर्योदय



खूप वर्षांपासून इच्छा होती अमेरिकेतल्या सर्वोत्तम नॅशनल पार्क पैकी दोन - यलोस्टोन आणि ग्रँड टेटोन या दोन ठिकाणी जाण्याची! दोन्ही पार्क तिथल्या भौगोलिक वैशिष्टयांसाठी खास प्रसिद्ध! ग्रँड टेटोन येथील पर्वतरांगा म्हणजे जणू काही काळ्याशार खडकांच्या टोलेजंग भिंती! पूर्व आणि पश्चिम दुभंगणाऱ्या या दोन्ही भिंतींच्या दोन्ही बाजूंना रोज सूर्योदय आणि सूर्यास्ताचा मस्त खेळ चालतो. एका दिवशी पूर्ण डोंगर लालेलाल करून टाकणारा तो सुप्रसिद्ध सूर्योदय बघण्यासाठी पोराबाळांना पहाटे पाच वाजता उठवून सूर्योदयाच्या आधी "श्वाबकर लँडिंग" या ठिकाणी गेलो. त्या पहाटे आमच्यासारखे अजूनही अनेक वेडे तिथे जमले होते. हौशी, नवशी आणि भ्रमणध्वनी धारक फोटोग्राफर्सनी सगळ्या मोक्याच्या जागा पटकावून ठेवल्या होत्या. कसाबसा नदीच्या पात्रापाशी मला माझा ट्रायपॉड ठेवायला जागा मिळाली. सगळं काही जमून आलं आणि सूर्यनारायणाने पर्वताच्या शिखरांना त्याच्या तांबूस, सोनेरी स्पर्शाने हलकेच जागं केलं. हळू हळू वरपासून खालपर्यंत टेटोनच्या काळ्या खडकाची सगळी भिंत त्या प्रकाशात उजळून निघाली. ते क्षण कॅमेरामध्ये आणि शब्दांत टिपण्याचे माझे हे प्रयत्न.....

निजलेले पर्वत, थिजलेली शिखरे
पहाटेच्या धुक्यात चांदणे ही बिखरे!

उगवणारा सूर्य, पसरणारी लाली
निस्तेज खडकांनाही उजळण्याची वेळ आली!

रोजचाच खेळ, रोजचीच वेळ
पृथ्वीचा सूर्याशी होणारा मेळ!

सरावलेला दिवस, भारावलेला मी
कितीही टिपले तरी पडतातच ते क्षण कमी!

**नितीन मुळे**



# 'धरोहर' निखळ आनंद देणारी मैफल!

रविवार, जून २९ मिनियापुलीसकरांनी संगीतकार सलील कुलकर्णीची ही आनंद देणारी मैफिल अनुभवली! अनेक वर्षांनी एका चांगल्या दर्जेदार मैफिलीचा आनंद मिनियापुलीसला मिळाला. वैयक्तिक पातळीवर मी सलील कुलकर्णीचा जीव की प्राण चाहता आहे आणि त्याच्या सुरवातीच्या काळापासून, म्हणजे 'तरीही वसंत फुलतो' या संग्रहापासून मी सातत्याने त्याच्या रचना आणि जमेल तेव्हा त्याच्या मैफलींना हजेरी लावतो. धरोहरची मी चातकाप्रमाणे वाट पाहत होतो, यात काही नवल नाही. सलील बरोबर शुभंकर काय गातो? याचीही तितकीच उत्कंठा मनात होती आणि ती उत्कंठा मनात बाळगूनच कार्यक्रम ऐकायला बसलो.

मला सलील कुलकर्णीच्या रचना, गाणी, संदीप खरे आणि इतर कवींच्या कविता तर आवडतातच पण याच बरोबर भावतो तो त्याच्या मैफलीत असणारा साधेपणा आणि सच्चेपणा! आजच्या भाषेत बोलायचं तर minimalistic approach. चांगल्या गाण्यासाठी खूप ताम झाम ची आवश्यकता नाही. सच्चा सूर नी आवश्यक वाद्यमेळ असला की चांगल्या सुराला या शिवाय कुठलाही मेकअप लागत नाही, मुळात चांगला सूर असावा लागतो. आयुष्यावर बोलू काही ला तर सुरवातीला फक्त तबला होता, रितेश ओहोळ आपल्या गिटारसाह थोडे नंतर आले पण त्यांची गिटारही खूप सुरेल आणि आनंद देणारी आहे. 'बाकी बाब आणि मी' ला ही तेच, आणि इतरही त्याच्या कार्यक्रमात हाच वाद्यमेळ असतो. उलट धरोहर साठी दोन वाद्य अधिकची होती. एक की बोर्ड आणि दुसरं दिमडी. प्रतिभावान कलाकार असले की ती मैफल वेगळ्या उंचीला जाऊन पोचते, तोच अनुभव धरोहर मधे आला. शुभंकरच्या गाण्यांना किबोर्ड मुळे अधिक रंगत आली. इंग्लिश गाणीही तितकीच उत्तम सादर झाली. तरुण आणि नव्या पिढीचा उत्साह उचंबळून आला आणि आमच्या अधिक ओळखीचं आणि आजच मिळाल्याबद्दल शुभंकर कुलकर्णी नव्या पिढीच्या गळ्यातला ताईत झाला! या सगळ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळ्याच आनंदाची लकेर उमटली.

थोडं तांत्रिक होईल पण याचा उल्लेख केल्यावाचून मी पुढे जाऊ शकत नाही. कुठलाही गाण्याचा कार्यक्रम चांगला व्हायला त्या ठिकाणची system चांगली असणं आवश्यक असत. हा आपल्या सगळ्यांचा अनुभव आहे, खासकरून अमेरिकेत बरेचदा केवळ system चांगली नसल्याने किंवा हवी तशी न लागल्याने सादरकर्त्यांचा आणि प्रेक्षकांचा भ्रमनिरास होऊन चांगल्या कार्यक्रमाचा परिणाम न साधल्याने कार्यक्रम पडतो. पण सलीलने हा प्रश्न स्वतः सोडवला, त्याने त्याचा mixer आणि साऊंड इंजिनियर स्वतः भारतातून आणला होता. सेट करत असतांना मी हे माझ्या कानांनी ऐकल "चला आता या उपलब्ध system च्या मर्यादा लक्षात घेऊन जे उपलब्ध आहे त्यात आपण चांगल्यात चांगलं कस करू शकतो ते पाहू." आपण सगळे साक्षी आहोत कार्यक्रम चालू झाल्यावर अरे मॉनिटर थोडा वाढावं रे, अरे हे बरोबर नाही, ते बरोबर नाही हे आपण एकदा ही ऐकलं नाही, उलट sound system उत्तम होती. (दिमडी कशी वाजली, एकदम कडक!) बरेचदा या sound system वरून सादरकर्ते आणि आयोजक हमरी तुमरी वर येऊन संबंध खराब झाल्याच्या अनेक घटना आपण ऐकतो. पण सलील कुलकर्णी सारख्या संवेदनशील कलाकारा ने ही बाब ओळखून, प्रेक्षकांना विना व्यत्यय संगीताचा आनंद मिळावा म्हणून उचललेल हे पाऊल नक्कीच स्वागतार्ह आहे. स्थानिक कलाकारांना मैफलीत सामावून घेणे हे सुद्धा सलील कुलकर्णीच्या कार्यक्रमांची विशेषता आहे.

शिवाय MAM ने या बाबतीत स्वतः लक्ष घालून आपल्या स्थानिक बाल ते किशोर वयीन मुला-मुलींना सलील कुलकर्णी यांच्या मैफलीत गायची संधी दिली. मैफलीत स्थान मिळाल्यामुळे ती मैफल सगळ्यांना आपलीशी वाटते. आज लहान वयाच्या या सगळ्यांना ही कायमची आयुष्यभर पुरणारी एक आठवण MAM ने मिळवून दिली. मोठ्यांना बरेचदा अश्या कलाकारांच्या मैफितून गायची संधी मिळते पण लहानांना नाही. लहानांना ही संधी मिळावी म्हणून वयाची अट ५ ते १८ ठेवण्यात आली होती. टवटवीत फुलांच्या ताटव्यासारखा तो बाळ गोपाळांचा मेळा अगोबाई-ढगोबाई साठी रंगमंचावर चढला आणि गाणं म्हणतांना हरखून गेला होता, त्यांच्यापेक्षा प्रेक्षागृहात बसलेल्या पालकवर्गाला त्या दिवशी स्वर्ग ठेंगणा झाला होता. रेकॉर्ड झालेले व्हिडियो आज्जी आजोबांपर्यंत पोचून आनंदाने त्यांच्या डोळ्याच्या कडा पाणावल्या असतील व आपापल्या सर्कल मध्ये नात/नातू viral झाले असतील. डीपाडी डिपांग गाण्यात मिनियापुलीसच्या तरुणींनी सहभागी होत एकच धमाल उडवून दिली आणि हौशीं मंडळींनी आपल्या नाचाची तहान भूक भागवून घेतली!

बालगीतापासून ते डीपाडी डिपांग पर्यंत सगळ्या वयोगटाला हृदयस्पर्शी वाटतील अशी गाणी. गाण्यातून उलगडणारी नाती-गोती, गाण्यांच्या गोष्टी, आठवणी, सलिलच खुसखुशीत बोलणं, हास्य फवारे, थोडे चिमटे व गुदगुल्या या सगळ्यात प्रेक्षकाचा श्रोता झाला, मग तो तल्लीन झाला, शेवटी त्याची ब्रह्मानंदी टाळी लागली. लहानपण, भक्ती गीत , भाव गीत, तरुणाईला हात घालणारी गाणी, किस्से करत करत मैफल एका हळव्या वळणावर आली होती. मैफलीचा थोडा हळवा झालेला मुड सलीलने स्वतः च बदलला. या सगळ्यात दोन अडीच तास कसे निघून गेले हे कळतंच नाही. मग सगळ्यांनाच असं वाटत राहिलं अरे हे गाणं घ्यायला हवं होतं. अरे हे राहून गेलं, हे म्हंटलं असतं तर बरं झालं असतं. अजून २० मिनिटं चालली असती की कार्यक्रमाला .... मला असं वाटतं हे कुठलीही मैफल ऐकताना असं वाटणं हे त्या मैफलीच खर गमक आहे! संकेत असा आहे मैफल त्याच्या सर्वोच्च आनंदाच्या क्षणी संपलेली चांगली. अश्या मैफली मनात घर करून असतात, येणारी कितीतरी वर्ष आठवणींच्या कोंदणात, मैफलीतले ते सूर अलंकाराप्रमाणे जपले जातात. अश्या मैफलीत 'धरोहर' नक्कीच सगळ्यांच्या मनात घर करून आहे.

**अमोल दांडेकर**

India Spice House Restaurant & Grocery

# INDIA SPICE HOUSE
## Restaurant & Grocery

Welcome to **INDIA SPICE HOUSE**, your premier destination for authentic **MAHARASHTRIAN CUISINE** and **GROCERIES**.
Our restaurant and grocery store are dedicated to serving the vibrant flavors of Maharashtra, right here in Eden Prairie, MN.

## SPECIAL ITEMS

### Restaurant

**MISAL PAV:**
Flavorful curry made with sprouted lentils, served with crispy bread

**PURAN POLI:**
Sweet flatbread stuffed with lentil and jaggery filling



**VADA PAV:**
Spicy potato fritter in a soft bun

### Grocery

Maharashtrian **SPICES** and **MASALAS**



**POHA**
(flattened rice)

**SHRIKHAND**
(strained yogurt dessert)

## SERVICES

**RESTAURANT**
Family-friendly dining, takeout, and catering services

**GROCERY**
Wide selection of Maharashtrian ingredients, snacks, and sweets

**VISIT US TODAY** and **INDULGE** in the **RICH FLAVORS** of **MAHARASHTRA!**

952.942.8010 8445 Joiner Way, Eden Prairie MN 55344




# माझी कविता

माझी कविता फक्त माझी नसते
ती माझ्या फुलांची असते, मोगऱ्याची, गुलाबाची असते

तिच्यात फक्त शब्द नसतात,
असतात माझ्या भावना,
शब्दात व्यक्त ने होणाऱ्या,
माझ्या डोळ्यातल्या भावना,
कोणालाही न दिसणाऱ्या,
अशा अनेक भाव-भावनांची सांगड
तयार करतात माझी कविता.
म्हणूनच माझी कविता फक्त माझी नसते,
ती त्या प्रत्येकाची असते.
जे माझ्या भावनांशी निगडित असतात.
नकळत माझ्या मनात डोकावतात,
माझ्या विचारांशी खेळतात
आणि कर्तव्य संपल्यासारखे निघून जातात.
अशावेळीच माझे शब्द मागे होतात,
ध्वनिनिर्माण होण्याआधीच शाई होतात
शुभ्र पांढऱ्या कागदावर विराजमान होतात,
आणि त्या सर्व कर्त्यांच्या मालकीचे होतात,
मी फक्त भाडे भरत असते,
माझ्या पैशांनी शाई भरत असते,
ते मात्र नकळत कागद भरवतात,
म्हणूनच माझ्या कविता माझ्या नसतात.

**प्रवीण पाठक**



# माझ्या अंगणी तुझे रंग

माझ्या या अंगणात तुझे रंग असावे
तुझ्या त्या मोहकतेने मन माझे उमलावे , मन
माझे उमलावे

तुझे ते वाऱ्यावरचे उत्साही हेलकावे , ऊन
पावसातही रूप खुलून जावे
माझ्या दारी जणू विजयाचे तोरण होऊन जावे,
विजयाचे तोरण होऊन जावे

सोनेरी सकाळ, केसरी संध्याकाळ सगळ्या
प्रहरी तू फुलावे
तू उमलावे मी पाहावे मन माझे तुझ्यात गुंतुनी
जावे , तुझ्यात गुंतुनी जावे

मंद मंद सुगंधाने मन मोहून ते जावे
गहिऱ्या हिरव्या पर्ण संगतीत गुंफून श्री चरणी
तुला अर्पावे , श्री चरणी तुला अर्पावे

नेहमी नव्याने तुला मी पहावे
केसरी, पिवळ्या विविध छटांनी रांगोळीचे रंग
भरावे , रांगोळीचे रंग भरावे

दिवाळी असो कि दसरा नयनी तू दिसावे
माझ्या आयुष्याला उत्सव करुनी ते सुख मी
पहावे , ते सुख मी पहावे

माझ्या या अंगणी - फुले झेंडूची

**रसिका राऊत**



# दिवाळी

दिवाळी
दिवाळीचा सण मोठा
नाही आनंदा तोटा
घरोघरी फराळाची ताटे
अन् बाहेर फुलबाज्या फटाके ...

अंगणात मुलांची टोळी
किल्ल्याची युक्ती सुचली
किल्ला बनवू शानदार
वरती होतील घोडे सवार ...

छानसा रंगीत कंदील
त्यावर नक्षी टिकल्या
वाऱ्यावर कंदील झुलतो
अन् कवडसे घरी पाडतो ...

अशीच यावी दिवाळी आनंदाची
करू साजरी दर वर्षी...

**छाया केळकर**



# पहांट भूल

दिवाळीची चाहूल देणारी धुक्याची पहाट रोज भेटीला यायला लागली. पुण्यांत भल्या पहाटे सारसबागेकडे चालत जाण्याचा आनंद काय वर्णावा ...अहाहा । मला तर या पहाटेची भूलच पडते . कशी ते या कवितेत वाचूया .

पहाट  भूल पडली सखे
पहाट भूल पडली ।
तलम धुक्यांतील जणू
रमणी मज भासली ॥१॥
चांदणे मोगरी
नभी कुंतली माळूनी ।
समीर शीत सोबती
गोड गंध घेऊनी ॥२॥
पानांचे वस्त्र तिचे
झाडे ही लेवूनी ।
सळसळसळ नाद जात
कानांना स्पर्शूनी ॥३॥
जलांवरी हास्य मधुर
चुळबुळ हो अंतरी
स्पर्शू कसे सांग सखी
रूप ते आरस्पानी ॥४॥
भेटते अशी मजला
पहांट भूल घालण्या ।
निघून जात ठेऊनी
दंवबिंदू पाऊलखूणा ॥५॥

**कुंदा शरद देशपांडे**

# उत्सव माझ्या दारी



स्वरांजली काळे




श्रध्दा बरीदे



स्नेहल मुळे



रसिका राऊत





# पाऊस नववधूचा

हासत आली नववधू दारी
लाजून गाली मोहरली
स्वागता आल्या पाऊस सरी
मनमोर धुंद शिरशिरी

बेभान वारा पाऊसधारा
अंगणी गारा टपटपती
ओला किनारा धुंद नजारा
पाखरे सहारा शोधती

केसात ओल्या जलाचे बिंदू
नक्षी होऊनी उमटती
करात कंगन पायात पैंजण
नादात हालत रूणझुणती

पावसासंगे ओलेत्या अंगे
वडाला फेरे घालती
झिम्मड झिम्मा फुगड्यांसवे
श्रावणखेळ मांडिती

प्रियाची वाट ओलीशी बट
गोऱ्या गाली रेंगाळती
गार या हवेत सजणा कवेत
मिटून जाता शहारती


गोरीशी नाजूक सुंदर पावले
अंगणी ओल्या नाचती
नाचता नाचता अल्लडपणे
पाऊलखुणा उमटती

**वर्षा देशपांडे**

# दीपावली



आकाशकंदील झिरमिळ झिरमिळ
लख्ख प्रकाश दिव्यांचा
भाग्य घेऊनि आली दिवाळी
ठेवा परम सुखाचा ||
रांगोळ्यांचा बहर अंगणी
नवरंग शोभती छान
पणती पणती ज्योत तेवते
झेंडू माळ कमान ||
शिवरायांचा बांधून किल्ला
वानरसेना पोरांची
शूर मावळे उभे त्यावरी
साक्ष जणू इतिहासाची ||
आतषबाजी फुलबाज्यांची
चक्र फटाके ते उडती
भुईनळ्यांच्या फुलती चांदण्या
टिकल्या भारी तुडतुडती ||
लाडू करंज्या शंकरपाळी
गंमत भारी चकल्यांची
जामुन चिवडा बासुंदी ती
गडबड वेड्या पोटाची ||
तेल सुवासिक उटणी भारी
सुडौल साबण मोत्यांचा
मंगल औक्षण दिवे कणकीचे
थाट माट बहु स्नानाचा ||
वसुबारस ही गोमातेची
गोड भाकरी बाजरीची
तेहतीस कोटि देव रक्षिते
थोर संस्कृती भारतीची ||
नरकासुर वध कुबेर पूजा
लक्ष्मी देवीची आरास
थाटामध्ये आला पाडवा
सुवासिनींचा तो खास ||
दीपावली हे सुंदर मंदिर
भाऊबीज हा कळस तया
त्रिभुवनात या अमर रहावी
भाऊबहिणीची ही माया ||



**शुभांगी काळे**

## उत्सव माझ्या दारी




प्रविणा पाठक



गौरी केळकर



स्नेहा जोशी



स्वरदा नवले




कल्याणी कुवळेकर




अमृता नगरकर



केतकी कुलकर्णी



अनुपमा जाधव



रुपाली तेलंग


# मंडळाचा प्रथम मंगळागौर उत्सव



या वर्षी आपल्या मंडळाने प्रथमच मंगळागौर हा पारंपरिक मराठी स्त्रियांचा उत्सव मोठ्या उत्साहात आणि आकर्षक पद्धतीने आयोजित केला. या उपक्रमामागील उद्दिष्ट म्हणजे आपल्या पारंपरिक सणांची ओळख समुदायातील फक्त महिलांना नाही तर संपूर्ण कुटुंबाला करून देणे, तसेच पुढील पिढीपर्यंत मराठी संस्कृतीचा वारसा पोहोचविणे हे होते.
या कार्यक्रमाची संकल्पना मंडळाच्या समितीने मांडली आणि काही महिला स्वयंसेविकांच्या सहकार्याने याचे नियोजन हाती घेण्यात आले. प्रारंभीच्या टप्प्यात कार्यक्रमाचा आराखडा तयार करून पारंपरिक घटकांचा समावेश — जसे की आरती, खेळ, फुगडी, आणि पारंपरिक नृत्य — यावर विशेष भर देण्यात आला. नियोजनाच्या सर्व टप्प्यांमध्ये स्वयंसेवकांनी उत्साहाने सहभाग घेतला. ह्या कार्यक्रमात फक्त महिलांनी नव्हे तर लहान मुले, आजी -आजोबा आणि पुरुषांनी सुद्धा आवर्जून सहभाग घेतला .
निवडलेल्या स्थळी पारंपरिक सजावट आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण करण्यात आले. महिलांनी पारंपरिक पोशाखांमध्ये सहभाग घेतला आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे मराठी संस्कृतीचे सौंदर्य सादर केले. खेळ, गाणी, आणि सामूहिक नृत्याच्या माध्यमातून सर्वांनी एकमेकांशी आपलेपणा आणि आनंद व्यक्त केला.
समुदायातील महिलांचा आणि उपस्थित सर्व सदस्यांचा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक होता. अनेकांनी हा उपक्रम नियमित स्वरूपात आयोजित करावा अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाद्वारे मंडळाने परंपरा, संस्कृती आणि सामूहिक सहभाग यांचा उत्कृष्ट संगम साधला.
मंगलागौर उत्सव २०२५ हा मंडळाच्या सांस्कृतिक उपक्रमांतील एक महत्त्वाचा टप्पा ठरला. या उपक्रमामुळे समुदायातील एकोपा, सहभाग आणि सांस्कृतिक अभिमान अधिक दृढ झाला. पुढील वर्षी हा कार्यक्रम अधिक व्यापक आणि समृद्ध स्वरूपात आयोजित करण्याचा संकल्प मंडळाने व्यक्त केला आहे.

**केतन कुलकर्णी**

## छोट्यांच्या दुनियेत!






**निरुक्ता पंचपुत्रे**






**आर्या पाठक**





मायरा नगरकर

पूनम कुंभार





अनिशा साखरकर








मिहिका गोरे








रिधीमा जोशी

मिहिरा जोशी



# कलाकौशल्य







**अंजली भुरे**



**मधुरा मोडक**





# टोमॅटोचे ताक घालून सार (सूप)






१. प्रथम टोमॅटो स्वच्छ धुवून प्रेशरकुक मध्ये टोमॅटो बुडतील इतके पाणी घालून ४ शिट्ट्या करून घेणे.
२. कुकर थंड होईपर्यंत लसूण, मिरची, कोथिंबीर, जिरे, मीठ ह्याचे तिखट मिक्सर मध्ये वाटून घेणे. वाटताना जरासे पाणी घालणे.
३. एकीकडे दह्याचे ताक करून घेणे. ताक खूप पातळ नाकी आणि खूप घट्ट हि नको.
४. शिजवलेले टोमॅटो मिक्सर मध्ये कुकर मधील उरलेले थोडे पाणी घालून फिरवून घेणे. नंतर ते गाळण्यावर गाळून घेणे.
५. उरलेला गाळ परत मिक्सर मध्ये फिरवून, परत गाळून घेणे.
६. आता टोमॅटोच्या रसामध्ये थोडेसे मीठ, थोडी साखर आणि वाटलेले ओले तिखट घालणे. गॅसवर टोमॅटोचा रस डावाने मध्यम आंचेवर ढवळत रहाणे. एकदम उकळी येईपर्यंत सार उकळवायचे नाही.
७. छोट्या कढईत तूप, जिरे, जिऱ्याची पावडर, हिंग आणि लाल सुक्या मिरच्या अशी फोडणी तयार करणे. गॅस बंद करून टोमॅटोच्या रसात घालणे.
८. नंतर तयार केलेले ताक आवडीनुसार थोडे थोडे घालून फिरवणे आणि नंतर गॅस बंद करणे.

**माधुरी परांजस्पे**



आरवच्या वर्गात
दिवाळीची माहिती देण्याचे
आमचे हे ४ थे वर्ष




**अमरजा बाबतीवाले**

# ढोल ताशा पथकाचा गजर मिनेसोटात!




महाराष्ट्रात मंगलकार्य असो वा सण समारंभ, प्रत्येक प्रसंगी आपल्याला अनेक पारंपारिक वाद्यांचा गजर ऐकू येतो. यामध्ये ढोल-ताशा हे वाद्य म्हणजे सणाचा आत्माच! या वाद्यांशिवाय कोणताही उत्सव, कोणतेही मंगलकार्य अपूर्ण वाटते. ढोल ताशा पथक हे केवळ वादकांचा समूह नसून एक सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना आहे—जिथे एकत्र येऊन ताल, शक्ती, आणि एकात्मतेचा अनुभव घेतला जातो.

ढोलताशाचा इतिहास आणि पार्श्वभूमी: ब्रिटिशकाळात विशेष प्रसंगी निघणाऱ्या मिरवणुका ढोल-ताशांच्या गजरातसजत असत. त्या काळीया मिरवणुकांसाठी खास परवानगी घ्यावीलागे. त्यामध्ये ध्वज, लेझीम, झांज यांसारखे खेळआणि कलाप्रकार सादर होत. काहीकाळानंतर या पारंपारिक मिरवणुकाबंद पडल्या, मात्र स्वातंत्र्यानंतर पुन्हा एकदा या कलाप्रकाराचानव्याने उदय झाला.लोकमान्यटिळकांनी १९व्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २०व्या शतकाच्याप्रारंभी गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले, आणि याच काळानंतरगणेशोत्सवात ढोल-ताशांचा गजरसुरू झाला. १९६० च्या सुमारासपुणे शहर व ग्रामीणभागातील काही कलाकारांनी ढोल, ताशा आणि झांज वादनाचीपरंपरा पुन्हा जोमाने सुरू केली. तेथूनचया वाद्यांचा आवाज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, आणि आता तर परदेशातहीघुमू लागला!

## मिनेसोटातील मराठी असोसिएशनचा ढोल ताशा पथक

आपल्या मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटामध्ये या वर्षी एक नवा उपक्रम आकारास आला — ढोल ताशा पथकाचा विस्तार!सुरुवातीला आपल्याकडे दोन ढोल आणि दोन ताशे होते. पण सदस्यांमधून अनेक जणांनी ढोल किंवा ताशा वादनाची इच्छा व्यक्त केली. ही उत्साही प्रतिक्रिया पाहता समितीने पुण्यातून ८ ढोल, २ ताशे, २ झांज, ८ झुल आणि १० झेंडे मागविण्याचा निर्णय घेतला. ही सामग्री मिळवणे, योग्य दर्जाची निवड करणे आणि ती मिनेसोटा येथे पोहोचवणे हे एक मोठं आव्हान होतं. तसेच समितीने नोंदणी फॉर्म प्रसिद्ध केला आणि तब्बल ५० पेक्षा अधिक सदस्यांची नोंदणी मिळाली.

## नव्या इतिहासाची सुरुवात



सामग्री मिनेसोटात पोहोचल्यानंतर स्वयंसेवकांनी मिळून ढोल आणि ताशांची जोडणी केली. मिनेसोटाच्या वार्षिक पिकनिकच्या दिवशी आपल्या पथकाचे पहिले पूजन करण्यात आले आणि सर्व सदस्यांनी उत्साहात या नव्या पर्वाची सुरुवात केली.



## अभिमानास्पद क्षण

आपल्या पथकाला “Best Parade Participant Award” मिळाला — हा क्षण संपूर्ण MAM समुदायासाठी अभिमानाचा होता. या यशानंतर मिनेसोटातील अनेक संस्थांनी आमंत्रणे दिली, ज्यामध्ये गीता आश्रम, Edina Asian American Alliance, राजस्थान असोसिएशन आणि हिंदू मंदिर दीवाळी उत्सव यांचा समावेश आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये आपल्या ढोल ताशा पथकाने जणू महाराष्ट्राची झलक मिनेसोटात आणली! प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया अविस्मरणीय होत्या —
“It felt like Mumbai in Edina!”  “Appreciate your efforts for spreading our Marathi culture!”

सर्व वादकांनी एकत्र येऊन सराव सुरू केला, आणि परिणाम विलक्षण झाला — आपल्या ढोल ताशा पथकाने इंडिया फेस्ट परेडमध्ये जबरदस्त ऊर्जा आणि उत्साह निर्माण केला!



**India Fest Indian Association of Minnesota. Location- Capitol Grounds**



**Ganapati Visarjan 2025 - Hindu Mandir**



**Diwali event of Edina Asian American Alliance**



**Ganapati Visarjan 2025 - Geeta Ashram Mandir**



**Rajasthan Association - Diwali Milan**



**Hindu Society of Minnesota Diwali Mela 2025. Location- Woodbury**

आपली ओळख – आपली संस्कृती
आपल्या पथकातील वादक विविध व्यावसायिक आणि सांस्कृतिक पार्श्वभूमीतील आहेत. परंतु सर्वांचा उद्देश एकच — या पारंपारिक कलाप्रकाराचे जतन करणे आणि पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवणे. आज मिनेसोटातील प्रत्येक भारतीय कार्यक्रमात, मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा ढोल ताशा पथक हे एक आकर्षण ठरले आहे. आपल्या ढोल-ताशांच्या गजरात केवळ आवाज नाही, तर महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा आणि एकात्मतेची झलक आहे.
या उपक्रमासाठी सर्व सहभागी वादक, समिती सदस्य, आणि समर्थक यांचे मन:पूर्वक आभार! आपल्या एकत्र प्रयत्नांमुळे महाराष्ट्राचा ताल आता मिनेसोटातही घुमत आहे!

**कार्यकारिणी समितीच्या लेखणीतून -अनुप वराडे**



# मराठी शाळा










**मराठी शाळा २०२५-२०२६**

२०२५-२०२६ पट संख्या - ६५+ विद्यार्थी

ह्या वर्षी मराठी शाळेचे हे पाचवे वर्ष आहे. ह्या वर्षी सप्टेंबर २०२५ मध्येच शाळेचे Record Breaking Admission !!!

आपल्या शाळेचे वर्ग आणि शिक्षक:
शिशु वर्ग - राहुल कोष्टी आणि स्वरा महाजन
प्राथमिक वर्ग - अभिरुची देशपांडे आणि मंजुश्री चांबारगे
माध्यमिक वर्ग - राजश्री पाटील आणि प्राजक्ता हेबळे
पारंगत वर्ग - रोहिणी माळगी आणि हर्षवर्धन लिमये
संगीत वर्ग - माधुरी गोसावी आणि उमा प्रधान

मे २०२५ मध्ये शाळेची वार्षिक परिक्षा झाली आणि जून २०२५ मध्ये शाळेची वार्षिक सहल झाली. आम्ही सर्व शिक्षकांनी आणि शाळेच्या मुलांनी मोठ्या संख्येने भाग घेऊन २०२४-२०२५ वर्ष यशस्वीपणे पार पाडले

Highlight of the year: आपल्या मराठी शाळेने BMM समूह गान स्पर्धेत १३२ USA/Canada शाळांबरोबर भाग घेऊन, संगीत शिक्षिका - माधुरी गोसावी हिच्या उत्कृष्ट मार्गदर्शनाखाली बक्षीस पटकावले. संगीत आणि भारताच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त केलेले सादरीकरण ह्या साठी आपल्या शाळेचे विशेष कौतुक झाले. सर्व गायक मुलांचे BMM प्रशांतीपत्रक आणि Gift कार्ड देऊन कौतुक करण्यात आले.

शाळेच्या आतापर्यंतच्या यशस्वी वाटचालीमध्ये, सर्व विद्यार्थ्यांचा, पालकांचा आणि शिक्षकांचा हातभार आहे. सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन आणि आभार

**मृदुला वडके**

# मराठी असोसिएशन ऑफ मिनेसोटा सांस्कृतिक कार्यक्रम





















